CNRMHAH1900 1707 2015

**<u>रे मु नं. ४६६/२०१५ मध्ये नि. ६० वर आदेश</u>**

( शंकर कुंडलीक बोडखे वि. आसाराम नामदेव लाड व इतर )

वादीने अर्जात असे म्हटले आहे की, वादीने दावा निरंतर ताकिदीसाठी दाखल केला आहे. दाव्याचे कामकाज चालू असताना दि. ०८.०१.२०२३ रोजी प्रतिवादी क्र १ आसाराम नामदेव लाड मयत झाले आहेत. त्याचे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करणे गरजेचे आहे. सबब,

- प्रतिवादी क्र १ आसाराम नामदेव लाड चे खाली
- प्रतिवादी क्र १अ शोभा आसाराम लाड, वय ६० वर्षे, धंदा शेती व घरकाम – पत्नी,
- प्रतिवादी क्र १ब शारदा आसाराम लाड, वय ५८ वर्षे धंदा शेती व घरकाम – पत्नी,
- प्रतिवादी क्र १क राजेंद्र आसाराम लाड, वय २८ वर्षे धंदा शेती – मुलगा,
- प्रतिवादी क्र १ड सुनिता आसाराम लाड, वय ३१ वर्षे, धंदा शेती व घरकाम – मुलगी
- सर्व रा. तेलकुडगाव, ता. नेवासा, जि. अहमदनगर अशी दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात यावी असे वादीचे म्हणणे आहे.

२. प्रतिवादीने अर्जाला म्हणणे दिले की अर्जातील कथन चूकीचे आहे तरी दुरुस्ती करण्याची परवानगी नाकारण्यात यावी.

३. दोन्ही बाजूंचे युक्तीवाद ऐकले.

५. अर्जामध्ये नमूद दुरुस्तीचे अवलोकन केले असता वादीने प्रतिवादी क्र १ चे वारस रेकॉर्डवर घेण्याबाबत दुरुस्ती करुन मागितलेली आहे. दावा निरंतर ताकिदीसाठी दाखल केलेला आहे. मयत प्रतिवादी क्र १ चे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी उशीर झाला होता त्याबाबत उशीर वादीने नि.५८ वर उशीर माफ होउन मिळणेकामी अर्ज दिला होता. सदर अर्ज नि. ५८ वादीला १००/– दंड भरण्याबाबत आदेश देउन मंजूर करण्यात आला होता. दावा स्थावर मिळकतीबाबत आहे. त्यामूळे दाव्यामध्ये सर्व पक्षकार सामील असणे गरजेचे आहे. त्यामुळे दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यास मदत होणार आहे. सदरच्या दुरुस्तीने न्यायनिर्णयात दाव्यातील खरा वाद सोडवण्यास मदत होइल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. वादीने सदरची दुरुस्ती आदेशापासून १४ दिवसात करावी.

sd/-

दि. २३/०१/२०२४
(एस. यू. जागुष्टे)

शेवगाव.
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
शेवगाव